Cocept OER मराठी इ.९वी.

# अलंकार

## विद्यार्थ्यांसाठी

विद्यार्थी मित्रहो,

कविता असो की पाठ वाचन असो,किंवा अन्य काही वाचन असो, नवीन काही तरी समजून घेतल्याचा आनंद तुम्ही घेत आहात, खरे ना? पण हा आंनंद आपल्याला का मिळतो? असा प्रश्न तुम्ही स्वत:ला नक्कीच विचारात असाल. त्याची उत्तरेही काही सर्वांसाठी समान तर काही व्यक्तींनुसार बदलतीलही.

साहित्यात वापरल्या जाणा-या शब्द किंवा वाक्य रचनेमुळे मिळणारा आनंद काही वेगळाच असतो.आत्तापर्यन्तच्या अभ्यासात तुम्ही काही चांगली वाक्य संग्रहित केली असतील, काही नवीन शब्द, कल्पना तुमच्या मनात रेंगाळत असतील.त्या आधारेच पुढील कृती आपण करून पाहू या.

**कृती क्र. १** –

ही कृती मोकळ्या तासाला (off period) करायची आहे.

आपण ज्या ओळीत बसतो, त्या ओळीतील विद्यार्थ्यांचा एक गट, असे गट करा. तुमच्या tablet वर खाली दिलेली वाक्ये/ओळी प्रत्येकाने वाचा. प्रत्येकाला वाक्ये/ओळी यातील जाणवलेला वेगळेपणा एकाच कागदावर पण गटाचा म्हणून नोंदवायचा आहे. त्यासाठी एक फुलस्केप कागद घ्या. त्यावर एकाने आपल्याला जाणवलेले वैशिष्ट्य नोंदवून,तो कागद पुढील विद्यार्थ्याकडे द्या. पुढील विद्यार्थी त्याला जाणवलेले वेगळे वैशिष्टय नोंदवेल .याप्रमाणे ओळीतील विद्यार्थ्यांना जाणवलेली सर्व वैशिष्ट्ये एकाच कागदावर नोंदविली जातील. एकच वैशिष्टय पुनःपुन्हा नोंदविले जाणार नाही याची काळजी घ्या. अशा त-हेने सर्व गट आपापली वैशिष्ट्ये नोंदवतील. वैशिष्ट्ये नोंदविलेले फुलस्केप कागद बोर्डवर लावा.अन्य गटांचे कागद वाचून किती विविध वैशिष्ट्ये नोंदविता आली ते समजून घ्या.

१.श्रावण विरंगुळ्याचे दिवस त्यांच्या आयुष्यात फुलपाखरासारखे घेऊन येतो.

२.अंधारात भेगाळल
भाकरीच सपान

३. आटत चाललेल्या धारेसारख्या तुटक बोलत.

४. शंकर आणि पार्बतीची सोबता आमची जोडी

५. माझ्या हातात मायने दिली
आकाशगंगा जंगलायाची: अवसेची पाटी झाली.

६. ‘घार हिंडते आकाशी चित्त तिचं पिल्लांपाशी’ असं झालंय.

७.प्रतिकूल परिस्थिती, आळशी आणि नकारात्मक मनोवृत्ती.......अशा कितीतरी अळ्या असतील हे अंकुर कुरतडणा-या ..

ही वाक्ये/कवितेच्या ओळी वाचताना तुम्हाला जो वेगळेपणा जाणवला तो का?

.

आता कवितेच्या टिपणातेल  मुद्द्यांच्या आधारे आपली निरीक्षणे तपासून पाहा.शिक्षकांबरोबर चर्चा करा.

खालील मुद्द्यांचाही विचार करा.

- ❖ यातील भावना/विचार व्यक्त करताना उपमेय व उपमान (संदर्भ:कुमारभारती, इ.९वी; पृ.क्र.)यातील साम्य लक्षात घेऊन साहित्यिकांनी शब्दरचना केली आहे.
- ❖ हे साम्य कधी स्पष्ट शब्दांत वर्णिले आहे तर कधी असे शब्द न वापरता. अशांचे गट करा.
- ❖ ज्या मध्ये साम्य स्पष्ट शब्दांत चित्रित केल्यामुळे  सौंदर्य निर्माण झाले, तो अलंकार कोणता आहे?
- ❖ ज्या मध्ये साम्य आहे पण हे साम्य आपण रसिक वाचक म्हणून समजून त्याचा आनंद घेतो,तो अलंकार कोणता आहे ?
- ❖ खालील सारणी पूर्ण करा.एक उदाहरण दिले आहे.

| **क्र.** | **उपमेय** | **उपमान** | **साम्य** |
|---|---|---|---|
| १. | विरंगुळयाचे दिवस | फुलपाखरू | स्वच्छंदीपणा ;आनंदमय, विविध रंगी जीवन, ओझ्याविना जीवन, तरलता, |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

वरील उपमेयांसाठी नवीन उपमाने लिहा व सारणी पूर्ण करा.

पाठ्यपुस्तकातील व पाठ्येतर साहित्यातील उपमेय व उपमाने शोधा. त्यातील चित्रित केलेले साम्य शोधा आणि वरील दोन्ही सारण्या पूर्ण करण्यातील आनंद घ्या.